


# सामुदायीक दडपणाशिवाय मार्ग नाही !

मुंबईत २१ मार्चला तीन हजार झोपडपट्टीवासियांचा मोर्चा विधानसभेवर गेला आणि वरळी येथील सुभाष-नगर झोपडपट्टीत झालेल्या बलात्कारासंबंधी जाब विचारला. तसं पहाता बलात्कार ही घटना सर्वच झोपडपट्टयात नित्याची बाब झालीय. पण वरळीच्या पंपींग स्टेशन नजिक असलेल्या झोपडपट्टीत त्याचे प्रमाण जास्त आहे याचे कारण या झोपडपट्टीत एक तर लाईट नाही. दुसरे म्हणजे संडास नाहीत. त्यामुळे स्त्रियांना अंधार असतांनाच प्रातर्विधीला जावे लागते. आणि नंतर काळोखात त्यांच्यावर सर्रास बलात्कार होतात. झोपडपट्टीवासियांची मागणी अशी होती की कार्पोरेशन पाणी–लाईटसाठी दहा रुपये प्रत्येक झोप-डीच्या मालकाकडून वसूल करते. तेव्हा कार्पोरेशनने लाईट द्यावेत आाण संडासही बांधून द्यावेत म्हणजे स्त्रियांना अंधारात इकडे–तिकडे जावे लागणार नाही.

या झोपडपट्टीतील एक झोपडी मध्य प्रदेशातून आलेल्या शिवबरन नाऊ व त्याची बायको चंद्रावती यांनी भाड्याने घेतली. त्यावरून काही भांडणे झाली. आणि झोपडपट्टीतल्याच काही गुंडांनी शिवबरनला मारहाण केली व त्याला त्याच्या झोपडीतच बांधून ठेवले आणि चंद्रावतीला मोकळ्या जागेत नेऊन तिच्यावर बलात्कार केला. ही घटना दोन मार्चच्या रात्री घडली. चंद्रावती सहा महिन्याची गरोदर होती आणि दहा–बारा गुंडानी केलेल्या बलात्कारामुळे तिचा गर्भपात झाला. ती बेहोष पडली आणि आता तर तिच्या मनावर या घटनेचा इतका परिणाम झालाय की लहान मुलगा दिसला तरी ती घाबरून ओरडते.

दहा गुंडांच्या पाशवी, अमानुष वर्तनाबरोबरच माझ्यामते पोलिसांचे वर्तनही तितकेच घृणास्पद आहे. कारण झोपडपट्टी राहिवासी कृतिसमितीचे काही कार्य-कर्ते वरळी पोलिस स्टेशनला तीन मार्चला तक्रार नोंदवायला गेले होते. परंतु स्वतः ती स्त्री आल्या-शिवाय तक्रार नोंदवता येत नाही असे पोलीसांकडून सांगितले गेले. त्यामुळे बलात्काराची तक्रार वरळी पोलिसस्टेशनला दिनांक १७ मार्चला म्हणजे घटना घडून गेल्यानंतर तब्बल पंधरा दिवसानी नोंदवली गेली.

त्यावेळी बाकीचे लोक मदतीला जाऊ शकले नाहीत. कारण एक तर अंधार आणि दुसरे म्हणजें घाण वाहून नेणारा जो दोन पुरूष खोल आणि चार पाच फूट लांबीचा नाला आहे तो झोपडपट्टी आणि रस्ता यांच्यामधून जातो. त्याच्यावर अगदी अरुंद अशी फळी टाकली आहे. त्याच्यावरून ये जा करावी लागते. ती फळी चंद्रावतीला पलीकडे नेल्यानंतर गुंडांनी काढून घेतली. त्यामुळे पलीकडे जाणे कठीण होऊन बसले.

चंद्रावतीवर गुदरलेल्या भयाण प्रसंगात मुंबईतल्या झोपडपट्टीच्या रहिवाशांनी सहानुभूती दाखवली. मोर्चा काढून मंत्र्याकडून दडपणे आल्यानंतर ही केस नोंदवून घेतली गेली. गुन्हेगारांपैकी तिघांनाच अटक झाली. तिथल्या लोकांचे म्हणणे असे की वरळी झोपडपट्टीतून हातभट्टीवाल्यांचा पोलिसांना काही हप्ता जातो. म्हणूनच केसेस् नोंदवून घेण्याचे कष्ट हे पोलीस घेण्याचे टाळतात काय ? तसे असेल तर मग सामुदायिक दबावाशिवाय उपाय नाही !

– अमरजा पवार, पुणे